


दैनिक
# यश सिद्धि न्यूज
Titie code MAHMAR 52037
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १३३ ● रविवार १४ मे २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| Volume 1 | Issue 133 | Date : 14/05/2023 | blow :Sanday | Page 4 | Price 4

# कर्नाटकात सत्ताबदल!
# काँग्रेसला स्पष्ट बहुमत





कर्नाटक : संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने दणदणीत विजय मिळवला आहे. कर्नाटकमधील मतदारांनी काँग्रेसच्या पारड्यात भरभरून मतदान केल्याने आता पक्षाला स्पष्ट बहुमतासह सरकार स्थापन करता येणार आहे. पुढील लोकसभा निवडणुकीपूर्वी दक्षिणेतील महत्त्वाच्या राज्यात झालेला हा पराभव भाजपसाठी धक्का मानला जात आहे. सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास जाहीर झालेले निकाल आणि मतमोजणीतील आघाडीनुसार, काँग्रेसच्या पारड्यात १३६ जागा जाताना दिसत आहे. तर, भाजपला ६४ जागांवर विजय मिळाला आहे. एक्झिट पोलमध्ये किंगमेकर राहण्याची शक्यता वर्तवलेला जनता दल सेक्युलरने २० जागांवर विजय मिळवला आहे. । पान २ वर

## एक मुख्यमंत्री आणि तीन उपमुख्यमंत्री ; काँग्रेसचा सत्तेचा नवा फॉर्म्यूला ?

**कर्नाटक : कर्नाटकात काँग्रेसचं सरकार आल्यानंतर आता अनेक प्रश्न विचारले जात आहेत. कर्नाटकचा पुढील मुख्यमंत्री कोण असणार? याचीही चांगलीच चर्चा रंगली आहे. यादरम्यान सूत्रांच्या माहितीनुसार, सिद्धरमय्या यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडण्याची शक्यता आहे. तसंच पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि प्रदेशाध्यक्ष डी के शिवकुमार यांना राज्य मंत्रिमंडळात मोठी जबाबदारी दिली जाऊ शकते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, राज्याला तीन उपमुख्यमंत्री मिळण्याची शक्यता आहे. कर्नाटकात काँग्रेस एक मुख्यमंत्री आणि तीन उपमुख्यमंत्री असण्याची शक्यता आहे. तीन उपमुख्यमंत्री लिंगायत, वोक्कालिगा आणि एक दलित समाजातील असतील अशी माहिती आहे. या तीन समाजातील उपमुख्यमंत्री नेमण्याचं कारण म्हणजे, या तिन्ही समाजातून काँग्रेसला मोठ्या प्रमाणात मतदान झालं आहे. दरम्यान, यामधील एक जण मुस्लीम समाजातील असू शकतो अशीही चर्चा आहे. मात्र अद्याप त्यावर शिक्कामोर्तब झालेलं नाही.**

## कर्नाटकमधील द्वेषाचं दुकान बंद, प्रेमाचं दुकान सुरू; विजयानंतर राहुल गांधींची प्रतिक्रिया

कर्नाटकातील काँग्रेसच्या घवघवतीत यशानंतर देशभरातून प्रतिक्रिया काँग्रेसच्या प्रतिक्रिया येत आहेत. या निवडणुकांसाठी काँग्रेसने आपली पूर्ण ताकद लावली होती. त्याचे सकारात्मक परिणाम देखील काँग्रेसला मिळाल्याचं चित्र कर्नाटकात पाहायला मिळालं. निवडणुकांच्या निकालादरम्यान काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे दिल्लीच्या काँग्रेस भवनात पोहचले. तिथे त्यांनी निवडणुकांच्या कलानंतर पहिल्यांदा माध्यमांशी संवाद साधला. कर्नाटकमधील द्वेषाचं दुकान बंद झालं असून प्रेमाचं दुकान सुरू झाल्याची प्रतिक्रिया राहुल गांधी यांनी दिली आहे. कर्नाटकात काम करणाऱ्या पक्षातील सर्व कार्यकर्त्यांचे, पक्षातील नेत्यांचे अभिनंदन राहुल गांधींनी केले. कर्नाटकात एकीकडे सरकारच्या भांडवदारांचे वर्चस्व होते, तर दुसरीकडे जनतेची ताकद



होती, त्यामुळे या निवडणूकीत ताकदीने वर्चस्वाचा पराभव झाला आहे असं राहुल गांधी म्हणाले. प्रत्येक राज्यात अशीच स्थिती निर्माण होणार असल्याचा विश्वास त्यांनी दाखवला आहे. 'काँग्रेस कर्नाटकातील गरीब जनतेसोबत उभी राहिली आहे, आम्ही प्रेमाने ही लढाई जिंकलो आहोत, तसेच कर्नाटकाने दाखवून दिले की या देशाला प्रेम आवडते' असं देखील राहुल गांधी माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले.


## कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांचा राजीनामा

कर्नाटक : कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी अखेर आपल्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. आज रात्री, त्यांनी राज्यपालांची भेट घेऊन आपल्या पदाचा राजीनामा दिला. राज्यपालांनी हा राजीनामा स्वीकारला आहे. तर, दुसरीकडे स्पष्ट बहुमत मिळवलेल्या काँग्रेस आमदारांची रविवारी बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत विधिमंडळाचा गट नेता ठरवण्यात येण्याची शक्यता आहे.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीचे आज निकाल जाहीर झाले. काँग्रेसने २२४ विधानसभा जागांपैकी १३६ जागा जिंकून दणदणीत विजय मिळवला. राज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह भाजपच्या दिग्गजांनी प्रचार केला होता. त्यानंतरही भाजपचा मोठा पराभव झाला. बसवराज बोम्मई यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, आम्ही हा जनादेश स्वीकारला आहे. आमच्यातील उणीवा दूर करून पुन्हा एकदा पक्ष संघटना उभी करू आणि लोकसभेत यश मिळवू असे बोम्मई यांनी म्हटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा कमी झाला नसल्याचेही त्यांनी सांगितले. कदाचित काँग्रेसने आमच्यापेक्षा अधिक चांगले प्रयत्न आणि रणनीती आखल्याने त्यांनी यश मिळवले असू शकते, असेही बोम्मई यांनी म्हटले.

## नाशिक शहरासह जिल्ह्यात तापमान वाढलं, आरोग्य विभाग सतर्क, हिट स्ट्रोक रूम सज्ज

नाशिक : नाशिक शहरात तापमान वाढत असून काल ३९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली. मात्र आदल्या दिवशी नाशिकचा पारा चाळिशीपार झालेला अनुभवयास मिळाला. तर जळगावमध्ये उष्माघाताने एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना देखील घडली.




या पार्श्वभूमीवर नाशिक आरोग्य प्रशासन सतर्क झाले असून मनपाच्या माध्यमातून चार रुग्णालयात हिट स्ट्रोक रूम सज्ज करण्यात आली आहेत.

गेल्या आठवडाभरापासून शहर परिसरात उष्णतेची लाट कायम आहे. शहरात सातत्याने तापमानाचा चाळीशीच्या आसपास राहत असल्याने शहरातील नागरिक घामाघूम झाले आहेत. मात्र दुपारच्या सुमारास सद्यस्थितीत नाशिककर बाहेर पडत नसल्याचे चित्र आहे. त्याचबरोबर पुढील काही दिवसांत शहराचे तापमान जैसे थे असणार असल्याने दुपारी बाहेर फिरणे नागरिक टाळत आहेत. पुढच्या काही दिवसात उष्णतेची लाट अधिक तीव्र होणार असण्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान या पार्श्वभूमीवर नाशिक महापालिका अलर्ट झाली असून पालिकेने चार रुग्णालयात उष्माघात कक्ष । पान २ वर

## महागाई दर घटला, कर्जे स्वस्त होणार ?

नवी दिल्ली : किरकोळ महागाई दरात घट झाली असल्याचे समोर आले आहे. किरकोळ महागाई दरात घट झाल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी समाधान व्यक्त केले. महागाई दरात झालेली घट ही समाधान देणारी बाब असल्याचे त्यांनी म्हटले. महागाई दरात घट म्हणजे आरबीआयचे पतधोरण योग्य दिशेने जात असल्याचे हे द्योतक असल्याचे त्यांनी म्हटले. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी महागाई दरात घट झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला, पण चलनविषयक धोरणाबाबत आरबीआयच्या भूमिकेबद्दल काहीही बोलण्यास नकार दिला. RBI चे ८ जून रोजी पतधोरण जाहीर होणार आहे. त्यावेळी आरबीआय व्याज दराबाबत आपली भूमिका स्पष्ट करेल, अशी माहिती त्यांनी दिली.



G-20 शेर्पा अमिताभ कांत यांच्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात शक्तीकांत दास यांनी २०२३-२४ मध्ये भारताचा आर्थिक विकास दर ६.५ टक्के राहील अशी आशा व्यक्त केली. ते म्हणाले की, खासगी गुंतवणुकीत तेजी दिसून येत आहे. पोलाद, पेट्रोकेमिकल्स आणि सिमेंट क्षेत्रातील गुंतवणुकीत तेजी आहे. भारताचा विकास जर ६.५ टक्के दराने झाला, तर जागतिक विकासात त्याचे योगदान १५ टक्के असू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांनी म्हटले की, खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील संशोधन आणि विकासावर होणारा खर्च वाढवण्याची गरज आहे. यासोबतच सुधारणा कायम ठेवण्यावर आणि उत्तम तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावरही त्यांनी भर दिला.

किरकोळ महागाई ४.७० टक्क्यांपर्यंत खाली आल्यानंतर आता महागड्या कर्जातून दिलासा मिळण्याची आशा वाढू लागली आहे. या आकड्यानंतर, असे मानले जाते की जून महिन्यात आरबीआयचे पतधोरण जाहीर करताना, जर पॉलिसी रेट म्हणजे रेपो रेट कमी केला नाही तर तो सध्याच्या पातळीवर स्थिर ठेवेल. या वर्षाच्या उत्तरार्धात व्याजदरात कपात अपेक्षित आहे.

एप्रिल महिन्यात आरबीआयने आपले पतधोरण जाहीर केले होते. त्यावेळी आरबीआयने रेपो दर स्थिर ठेवला होता. महागाई आटोक्यात येत असल्यानं आरबीआयच्या रेपो रेटमध्ये बदल न करण्याचा निर्णय घेतला होता. सध्या आरबीआयचा रेपो रेट ६.५० टक्के आहे.

किरकोळ महागाई दरात (ग्राहक किंमत निर्देशांक) घट झाली आहे. एप्रिलमध्ये, नवीन आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या पहिल्या महिन्यात, किरकोळ चलनवाढीचा दर ४.७० टक्क्यांवर आला आहे. मार्च २०२३ मध्ये हा दर ५.६६ टक्के होता. हा सलग तिसरा महिना आहे जेव्हा महागाई दर खाली । पान २ वर

## मुंबईसह भारतात ३० लाख बनावट सिमकार्ड, एका आरोपीकडून आपल्या फोटोवरुन तब्बल ६८५ सिम कार्ड जारी

मुंबई : मुंबई पोलिसांनी शेकडो पोलिसांच्या मदतीने अशा लोकांना अटक केली आहे, जे एका फोटोचा वापर करुन हजारो सिमकार्ड जारी करत असत. यानंतर हे सिमकार्ड बनावट कॉल सेंटर्स, बुकी किंवा इतर कोणतेही अवैध काम करणाऱ्या लोकांना वापरण्यात देत असत. मुंबई पोलिसांचे सहआयुक्त कायदा व सुव्यवस्था सत्यनारायण चौधरी यांनी सांगितलं की, दूरसंचार विभागाने (DOT) आमच्याशी एक माहिती शेअर केली होती की त्यांनी त्यांच्या सुपर कॉम्प्युटरच्या मदतीने संशयास्पद सिमकार्ड ओळख पटवली आहे. एकाच व्यक्तीचा वेगवेगळ्या अँगलमधून काढलेले फोटो वापरु शेकडो सिमकार्ड जारी करण्यात आली आहेत, ज्याचा वापर चुकीच्या लोकांकडूनही होऊ शकतो.

ही माहिती मिळाल्यानंतर मुंबईतील व्हीपी रोड पोलीस स्टेशन, डीबी मार्ग पोलीस स्टेशन, मलबार हिल पोलीस स्टेशन, सहार पोलीस स्टेशन आणि बांगूरनगर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांची पथके तयार करण्यात आली आणि त्यानंतर डीओटीला मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी ज्या ज्या ठिकाणांहून ही सिमकार्ड जारी करण्यात आली होती तिथे शोध घेतला.

चौधरी पुढे म्हणाले की, या संपूर्ण प्रकरणाच्या तपासादरम्यान आम्ही पाच गुन्हे नोंदवले आहेत आणि या प्रकरणांमध्ये १३ आरोपींना अटक देखील केली आहे. अधिक चौकशी आणि तपास केला असता, मुंबईतील ६२ जणांनी स्वत:चे फोटो वापरुन एकूण ८५०० सिमकार्ड जारी केल्याचे समोर आलं आहे. या तपासादरम्यान, मुंबईला लागून असलेल्या मीरा रोड परिसरात सुरु असलेल्या बनावट कॉल सेंटरला एका व्यक्तीने काही सिमकार्ड दिल्याची माहिती पोलिसांना




मिळाली, त्यानंतर पोलिसांनी त्या कॉल सेंटरवर छापा टाकला आणि तिथून ५२ सिमकार्ड जप्त केली.

व्हीपी रोड पोलिसांनी विशाल शिंदे नावाच्या आरोपीला अटक केली आहे, त्याचं वय ३३ वर्षे असून, त्याने त्याचा फोटो वापरुन ३७८ सिमकार्ड जारी केले होते. डीबी मार्ग पोलिसांनी अब्दुल शेख नावाच्या व्यक्तीला अटक केली ज्याने त्याचा फोटो वापरुन १९० सिम कार्ड जारी केले. । पान २ वर

## 'शासन आपल्या दारी' अभियान अधिक व्यापक करणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



सातारा : शासनाच्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या 'शासन आपल्या दारी' अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सातारा जिल्ह्यातील दौलतनगर (ता. पाटण) येथे करण्यात आला. नागरिकांना मोठ्या प्रमाणात शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी हे अभियान अधिक व्यापक करण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी यावेळी सांगितले.दौलतनगर येथील श्रीमती विजयादेवी देसाई विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय परिसरात आयोजित या कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय कार्यालयात जावे लागते. अनेकजण योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. या योजना सुलभपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासठी 'शासन आपल्या दारी' अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात नागरिकांना याचा लाभ देण्यात येत आहे.

'लेक लाडकी' सारखी योजना प्रथमच सुरू करण्यात आली असून. महिलांना एसटी बस प्रवास भाड्यात सवलत देण्यात आली आहे. या योजना सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात बदल घडवून आणणाऱ्या असल्याने त्यांचा लाभ देण्यासाठी शासन आपल्या दारी आले आहे. प्रशासन नागरिकांपर्यंत पोहोचल्यास जनतेच्या समस्या कळू शकतात. ही योजना अधिकाधिक जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करावात यावा, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.श्री.शिंदे म्हणाले,शासनाने सर्वसामान्य माणसाच्या हिताचे निर्णय सातत्याने घेतले आहेत. अनेक प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करताना मंत्रिमंडळ बैठकीत ३०० पेक्षा अधिक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. अल्पावधीत २९ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. शेतकऱ्यांना संकटकाळात दिलासा देण्यासाठी एनडीआरएफच्या निकषापेक्षा दुप्पट मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

'नमो शेतकरी' योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ६ हजार रुपये देण्याची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली. सामान्य माणसालाही मुख्यमंत्र्याला भेटावेसे वाटते हा विश्वास शासनाविषयी निर्माण झाला आहे. सातारा जिल्ह्यासाठी २ हजार ४५ कोटी रुपयांचा निधी विकासकामांसाठी शासनाने दिला आहे. डोंगरी विकासाच्या २०० कोटी रुपयांच्या प्रस्तावांनाही मान्यता देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.पाटील म्हणाले, अधिकाऱ्यांनी शासनाच्या योजना जनतेला समजावून सांगाव्यात आणि त्यांचा लाभ त्यांना द्यावा या हेतूने 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात । पान २ वर

✻ सुविचार ✻

चांगला वक्ता हा जातिवंत वीर असतो.

# संपादकीय

## पाकिस्तानमधील घडामोडी

इम्रान खान यांना इस्लामाबाद हायकोर्टाच्या आवारातच अटक करण्यात आली आहे. ते तेथे त्यांच्यावर लावण्यात आलेल्या भ्रष्टाचाराच्या दोन खटल्याच्या कामकाजासाठी गेले असताना त्यांना पाकिस्तानी रेंजर्सच्या जवानांनी अत्यंत क्रूर पध्दतीने ताब्यात घेतले. या जवानांनी अचानक कोर्टाच्या आवारात धाव घेत परिसराचा ताबा घेतला. इम्रान यांच्या सुरक्षा जवानांना दूर सारण्यात आले, त्यांच्या वकिलांवर हल्ला करण्यात आला आणि त्यांची गचांडी पकडून त्यांना कारागृहाच्या व्हॅनमध्ये कोंबण्यात आले. अलीकडे त्यांनी आरोप केला होता. मला ठार मारण्याचा कट आयएसआयने रचला आहे, असे त्यांचे म्हणणे होते. हा आरोप केल्यानंतर इम्रान यांना दुसऱ्याच दिवशी कारागृहात टाकण्यात आले आहे. इम्रान यांच्यावर भ्रष्टाचार, निंदा, लष्कराच्या विरोधातील कटकारस्थान वगैरे कारणातून एकूण १४० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, असे सांगण्यात येत आहे. गेल्या एप्रिल महिन्यात इम्रान यांचे सरकार सत्तेवरून खाली खेचण्यात आले. त्यानंतर त्यांनी देशाच्या लोकशाहीसाठी एकाकी लढा पुकारला होता. इम्रान यांच्यावर भ्रष्टाचाराचे असंख्य आरोप असले तरी त्यांनी त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी चांगले प्रयत्न केले होते हे नाकारता येणार नाही. त्यांनी पंतप्रधानपदावरील व्यक्तीवर नेहमी जो खर्च केला जायचा, तोही त्यांनी कमी केला होता. इम्रान खान यांना भारताबरोबर फारसे सलोख्याचे संबंध राखण्यात यश आले नाही हे जरी खरे असले, तरी भारताविरुध्द आक्रस्ताळी पध्दतीने गरळ ओकण्यावर मात्र त्यांचे बरेच नियंत्रण राहिले होते. पण त्यांना या पध्दतीच्या राजकारणाने लाभ होण्याऐवजी तोटाच होताना दिसला. या साऱ्या पार्श्वभूमीवर त्यांना अटक झाल्याने पाकिस्तानचे पुढील राजकारण कोणत्या दिशेने वळण घेणार हे पाहावे लागेल. या ताज्या घडामोडींमुळे पाकिस्तानच्या अस्थिरतेत भरच पडणार आहे. त्या देशात आता देशावर एकहाती नियंत्रण मिळवू शकणारा नेता शिल्लक नाही. विद्यमान पंतप्रधान शहाबाज शरीफ यांच्याकडे सध्या त्या देशाची सूत्रे असली तरी त्यांचा वकूब यथातथाच आहे. त्यामुळे पाकिस्तानचे भवितव्य आणखीनच दोलायमान झाले आहे, असा निष्कर्ष कोणीही सहज काढू शकेल. भारताच्या दृष्टीने ही चिंतेचीच बाब राहणार आहे. कारण अस्थिर आणि अस्वस्थ शेजारी हा नेहमीच घातक आणि त्रासदायक असतो. त्यामुळे भारताला तेथील नव्या घडामोडींकडे बारकाईने लक्ष ठेवावे लागणार आहे.

# छत्रपती संभाजी महाराज धर्माचे नव्हे तर कर्माचे राजे

छत्रपती संभाजी महाराज बहुजन समाजातील एक आदर्श व पराक्रमी राजा होते. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या वडिलांचा समतेचा, बंधुतेचा व सामाजिक न्यायाचा, वारसा समोर चालवून अन्याय अत्याचाराला व अन्याय अत्याचार करणाऱ्याला हत्तीच्या पायदळी तुडवून सामाजिक न्याय जिवंत ठेवला. छत्रपती संभाजी महाराज हे जातीचे राजे नव्हते तर ते कर्माचे व मानवतेचे राजे होते. ही गोष्ट अगोदर आपणास समजून घेणे गरजेचे आहे. परंतु काही धर्मांध व नीच राजकारण करणाऱ्या लोकांनी संभाजी महाराजांना धार्मिक बनवून, त्यांचे कार्य मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. परंतु छ. संभाजी महाराजांना मर्यादित करून त्यांचे कार्य कितीही लपवण्याचा प्रयत्न केला, तरीही संभाजी महाराजांच्या कार्य व त्यांची ख्याती कीर्ती आणि मानसन्मान हा कमी होणे शक्य नाही. संभाजी महाराजांबद्दल धर्मांध आणि राजकारणी लोक चुकीचा अपप्रचार करून त्यांना धर्मात बंद करत आहेत. एक साधी गोष्ट आहे जातीचा व धर्माच्या जोरावर गावातील माणूस सरपंचही होऊ शकत नाही. त्यालाही सर्वांना सोबत घेऊन चालावे लागते, तरच तो सरपंच होऊ शकतो. छत्रपती संभाजी महाराज तर राजे होते आणि राजाला जात धर्म नसतो, राजाची ओळख तर कर्मावरून होत असते. भारतामध्ये ५६० पेक्षा जास्त संस्थाने अर्थात राजे असूनही आम्हाला मोजकेच राजे माहित आहेत. व त्यांचाच लोकशाहीमध्येही राजा म्हणून गौरव केला जातो. यावरून आम्ही ज्या राजांचा गौरव करतो तो त्यांच्या धर्मामुळे नव्हे तर त्यांच्या कर्मामुळे. आपण जेव्हा एखादी गोष्ट धर्मात किंवा जातील बंद करतो, तेव्हा त्याचे सार्वजनिक कार्य व विचार संपुष्टात येत असतात. आणि एका जातीच्या व धर्माच्या व्यक्तीला इतर जाती धर्मांच्या माणसांनी का मानावे हाही प्रश्न येतो. छत्रपती संभाजी महाराज समजून घेताना देशाचे व भेदभावाचे राजकारण करणाऱ्या नेत्यांना बाजूला सारून त्यांच्या मताचा विचार न करता संभाजी महाराजांच्या जीवनावरील बहुजन लेखकांनी लिहिलेले पुस्तके वाचणे अत्यंत आवश्यक आहे. तरच आम्हाला छत्रपती संभाजी महाराज व त्यांचे कार्य हे कळेल. छत्रपती संभाजी महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा समता, बंधुता व न्यायाचा वारसा समोर चालू ठेवला. कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता १८ पगड जातीतील लोकांना एकत्र ठेवून मावळा हीच ओळख करून ठेवली. न्याय देताना जाती धर्माचा विचार न करता गुन्हा बघून गुन्हेगाराला शिक्षा दिली. छत्रपती संभाजी महाराज त्यांचे विचार व कार्य लोकशाहीतही टिकून आहेत. याचाच अर्थ त्यांचे कार्य व विचार लोकहिताचे, जनकल्याणाचे समतेची व न्यायाचे होते. परंतु त्याच संभाजी महाराजांच्या राज्यामध्ये, संभाजी महाराजांच्या नावावरती छत्रपती शिवाजी महाराज यांना धार्मिक बनवून मतांची झोळी भरली जाते. निवडून आलेले लोक छत्रपती संभाजी महाराज व शिवाजी महाराज यांच्या विचारांवर जनकल्याणाचे काम करत तर नाहीत, उलट न्यायदानाचे काम करताना जात, धर्म, राजकीय वशिला या बाबीचा ही विचार केला जातो. आणि त्याचमुळे ज्याच्या वरती अन्याय अत्याचार झाला अशा लोकांना न्याय मिळत नाही. उलट पक्षी अन्याय अत्याचार करणारे लोकांना जाती-धर्माच्या नावाखाली वाचवले जाते ही शोकांतिका आहे. जर आम्ही संभाजी महाराज योग्य पद्धतीने समजून घेतले असते तर त्यांना, जाती धर्मामध्ये बांधून राजकीय वापर केला नसता. तर संभाजी महाराजांची विचार व कार्य देशातच नव्हे तर जगभर पोचले असते. कारण छत्रपती संभाजी महाराज हे कधीही न हरणारे एकमेव पराक्रमी राजा होत. त्यांचा पराक्रम त्यांचा जनकल्याण या गोष्टीवरती कोणीच बोलत



नाही. कोणत्या गोष्टी समजूनही घेत नाही. फक्त संभाजी महाराजांची हत्या औरंगजेबाने केली, त्याला धार्मिकतेशी सोडून देऊन समाजामध्ये द्वेष पसरवण्याचे काम येथील धर्मांध व स्वार्थी राजकारणी करत आहेत. परंतु संभाजी महाराजांची हत्या नेमकी मुस्लिमांच्या धर्मानुसार झाली की इतर धर्मानुसार? यावर मात्र चर्चा करायला कोणीही समोर येत नाही. जो कोणी सत्य सांगतो त्याला हे धर्मविरोधी म्हणून शिक्कामोर्तब करून मोकळे होतात. परंतु एखाद्याला अडवणे यापासून रोखणे म्हणजे सत्य उघड होणार नाही असे मुळीच नाही. छत्रपती संभाजी महाराजांसोबत अठरापगड जातीतील लोक होते, याचा अर्थ ते जनतेचे राजे होते. मग संभाजी महाराज समजून घेताना आपल्याला हे लक्षात घेणे आवश्यक आहे संभाजी महाराजांनी ज्या लोकांना हत्तीच्या पायाशी दिले होते तर ते लोक कोण होते? त्यांना हत्तीच्या पायाशी का दिले होते? याचा विचार करणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजी महाराजांना मानतो म्हणजे फक्त त्यांच्या फोटोला मानने नव्हे, तर छत्रपती संभाजी महाराजांचे विचार स्वतः आत्मसात करून, त्यांच्या विचारांची पेरणी समाजामध्ये करणे, छत्रपती संभाजी महाराजांच्या स्वराज्यामध्ये सर्व जाती धर्माचे लोक आनंदाने नांदत होते. जर छत्रपती संभाजी महाराजांचा सन्मान करत असू, छत्रपती संभाजी महाराजांना मनापासून मानत असु तर आम्हाला छत्रपती संभाजी महाराजांच्या स्वराज्यामध्ये वावरताना समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय यावर आधारित विचाराची पेरणी करून, विषमता, भोंदूगिरी, पाखंडगिरी, याला मूठ माती देणे आवश्यक आहे. कोणत्याही चुकीच्या, काल्पनिक असलेल्या, सत्यता नसलेल्या गोष्टी यांचा संदर्भ धर्माशी जोडणे हे मानसिक गुलामाचे लक्षण होय. ज्या ठिकाणी विषमता, अंधश्रद्धा, पाखंड, भोंडगिरी या गोष्टी चालतात, आणि धर्माच्या नावाखाली या गोष्टीचे संवर्धन केले जाते. त्या ठिकाणी संभाजी महाराजांचे विचार व कार्य नसते. कारण छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर संत तुकाराम महाराजांचे वैचारिक व सामाजिक संस्कार होते. तुकाराम महाराज यांचे संस्कार असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही प्रकारची अंधश्रद्धा न पळता कोणत्याही प्रकारचे पंचांग न पाहता आपल्या कार्याला सुरुवात केली होती. संभाजी महाराजांनी जीवनातील एकही लढाई हरले नाही. परंतु एकही लढाईला पंचांग पाहून ते गेले नाही. याचाच अर्थ आम्हाला थोतांड बाजूला सारून, भोंदूगिरी व अंधश्रद्धा बाजूला सारून, सत्य- विज्ञान व तर्क याचा आधार घेऊन छत्रपती संभाजी महाराजांची विचार स्वीकारणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य व विचार एका लेखांमध्ये, एका पुस्तकामध्ये बंद करणे एवढे सोपे नाही. तरीही संभाजी महाराज यांच्या जीवनातील घडामोडी व त्यावेळेसची जीवनपद्धती, न्याय पद्धती, याचा तुलनात्मक अभ्यास करून त्या पद्धतीची व्यवस्था आज आहे का याचा प्रामाणिकपणे विचार करणे आणि तशी व्यवस्था नसेल तर तशी व्यवस्था निर्माण करून विषमता भोंदूगिरी अंधश्रद्धा पाखंड याला बाजूला सारणे, हे काम जर करत असो तरच आम्ही छत्रपती संभाजी महाराजांचे वैचारिक वारसा होत, व त्यांच्या विचाराचा त्यांच्या कार्याचा व त्यांचा मी सन्मान करतो हे तेव्हाच सिद्ध होईल. म्हणून त्यांच्या जिवनावर लिहणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजी महाराज फक्त राजेच नव्हते तर एक कर्तबगार व्यक्ती, विद्वान, शिक्षण व साहित्याचे महत्त्व असलेले महान व्यक्ती होते. छत्रपती संभाजी महाराजांनी अगदी बालवयामध्ये चार ग्रंथ लिहिले. एकही ग्रंथ त्यांनी भाषांतरित केला नाही हे विशेष. छत्रपती संभाजी महाराज यांना मराठीसह सात भाषा अवगत होत्या, युद्ध कौशल्य हा तर त्यांचा जमेचा विषय होता. परंतु राज्यकारभार करताना योग्य ते निर्णय घेणे, कमी खर्चामध्ये योग्य असे काम त्यांनी केले, याचाच अर्थ छत्रपती संभाजी महाराज कुशल व्यवस्थापक सुद्धा होते. संभाजी महाराजांची ग्रंथ संपदा जर बघितली तर, त्यांनी स्वतः चार ग्रंथ 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ, तर 'नायिकाभेद', 'नखशीख' आणि 'सातसतक' हे ब्रज भाषेतले ग्रंथ लिहिले. स्वतःला छत्रपती संभाजी महाराजांचे मावळे समजत असाल आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर लिहिलेले अथवा संभाजी महाराजांनी लिहिलेले ग्रंथ जर आम्ही वाचत नसू तर छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी वैचारिक व सामाजिक बेईमानी केल्यासारखे होईल. म्हणूनच संभाजी महाराजांना समजून घेताना संभाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आम्ही विद्वत्तेला महत्त्व देऊन, स्वतः विद्वान व्हायला सुरुवात करावी. संभाजी महाराजांना सात भाषा अवगत होत्या किमान आम्हाला एका भाषेत जे काही लिहिलेलं आहे ते सत्य स्वीकारण्याची तरी हिम्मत आमच्यामध्ये व्हायला पाहिजेत. आम्ही नाही ग्रंथ लिहू शकलो तरी चालेल परंतु संभाजी महाराजांनी लिहिलेले ग्रंथ आम्हाला वाचता व वाचवता आले पाहिजे. तरच आम्ही संभाजी महाराजांचे वैचारिक वारस व अनुयायी आहोत हे सांगण्यात अभिमान वाटेल.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समस्त बहुजनवादी विज्ञानवादी व मावळा असल्याचा गर्व असणाऱ्या सर्व मानवांना मंगलमय सदिच्छा..

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगाव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## कर्नाटकात सत्ताबदल!

निवडणुकीतील या विजयानंतर देशभरात काँग्रेसने जल्लोष साजरा केला.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीचे निकाल हे भारतीय जनता पक्षासाठी एका मोठ्या झटक्यापेक्षा कमी नसल्याचे म्हटले जात आहे. मावळत्या सरकारचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई सरकारमधील अनेक मंत्र्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. बी श्रीरामुलू, के सुधाकर, जेसी मधुस्वामी, गोविंद करजोल, एमटीबी नागराज जेसी नारायण गौडा आणि विधानसभा अध्यक्ष व्ही. हेगडे यांच्या नावांचा समावेश आहे. बसवराज बोम्मई यांनी शिग्गाव आणि भाजपचे ज्येष्ठ नेते बी. एस. येदियुरप्पा यांचा मुलगा विजयेंद्र हे शिकारीपुरा मतदारसंघातून विजयी झाले आहेत.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी भाजप नेते आणि मंत्री आर अशोक यांचा १ लाखांहून अधिक मतांनी पराभव केला. दुसरीकडे, चित्तापूर मतदारसंघातून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा मुलगा प्रियांक यांनी भाजपच्या मणिकांत राठोड यांचा १३,००० हून अधिक मतांनी पराभव केला.

माजी मुख्यमंत्री एचडी कुमारस्वामी यांना मोठा धक्का बसला आहे. रामनगरममध्ये एचडी कुमारस्वामी यांचा मुलगा निखिल यांचा काँग्रेसचे उमेदवार एचए इक्बाल हुसैन यांच्याकडून १० हजार ७१५ मतांनी पराभव झाला आहे.

बेळगावला कर्नाटकच्या उपराजधानीचा दर्जा आहे. बेळगाव जिल्ह्यामध्ये १८ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यामध्ये तब्बल ११ जागांवर काँग्रेसने विजय मिळवला आहे, तर सात जागांवर भाजपला समाधान मानावे लागले आहे. या ठिकाणी महाराष्ट्र एकीकरण समितीला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दुसरीकडे काँग्रेसने तब्बल अकरा जागा जिंकत आपलं वर्चस्व प्रस्थापित केलं आहे. कर्नाटक विधानसभा निवडणूक प्रचारातील मुद्यांवरून चांगलीच गाजली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार टीकास्त्र सोडले होते. त्याशिवाय, बजरंग दल आणि पीएफआयवरील बंदीचे आश्वासन काँग्रेसने दिले होते. त्या मुद्यावरून भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याला हिंदुत्ववादाशी जोडले आणि हनुमानाचा अपमान असल्याचे प्रचारात म्हटले. तर, काँग्रेसने स्थानिक मुद्यावर भर दिला होता.

## 'शासन आपल्या दारी' अभियान..

येत आहे. शासनाने ७५ वर्षावरील ज्येष्ठांना एसटीचा मोफत प्रवास आणि महिलांना ५० टक्के सवलतीची योजना सुरू केली. याचा मोठ्या प्रमाणात लाभ नागरिकांना झाला. जलयुक्त शिवार योजना नव्याने सुरू करण्यात आली. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत सामान्य शेतकऱ्याला उभे राहता आले. दुधाळ जनावरांचे अनुदान वाढविण्यात आले, सातबारा ऑनलाईन देताना डिजिटल स्वाक्षरीद्वारे उपलब्ध झाला, ६०० रुपये ब्रास दराने वाळू, १०० रुपयात आनंदाचा शिधा अशा अनेक जनकल्याणकारी योजना शासनाने सुरू केल्या आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले. ते म्हणाले, शासकीय अधिकारी हे जनतेचे सेवक आहेत. 'शासन आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकारी शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी जनतेच्या दारात जात आहेत. नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे हे शक्य झाले आहे. अधिकाऱ्यांनी आठवड्यातील एक दिवस जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी नागरिकांपर्यंत पोहोचावे. शासनाने निर्णय घेतल्याने भूकंपग्रस्तांच्या पुढील पिढ्यांना लाभ होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

आमदार शहाजी पाटील यांनीदेखील यावेळी विचार व्यक्त केले. मुख्यमंत्री शिंदे यांच्यामुळे रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी तत्काळ मदत मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे गजानन पाटील यांनी अभियानाची माहिती दिली. लाभार्थ्यांना एखाद्या योजनेचा लाभ तत्काळ देण्यासाठी ८ हजार योजनादूत सातारा जिल्ह्यात योजनांची माहिती देत आहेत. त्यामुळे एक लाखापेक्षा अधिक लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

'शासन आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यातील २५ हजार ६९९ पात्र लाभार्थींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला. कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक न्याय, कृषी, महिला व बाल कल्याण, रोजगार यासह १७ विभागाकडील योजनांचा लाभ पात्र लाभार्थींना देण्यात आला. महसूल व सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येणाऱ्या विविध दाखल्यांचे वाटपही यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात करण्यात आले.

अभियानाद्वारे तहसील कार्यालय पाटणकडून १० हजार १५१ लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे. तसेच पंचायत समिती पाटणकडून ९ हजार ३७१, वेल्फेअर बोर्ड साताराकडून १ हजार ५५१, तालुका कृषी अधिकारी पाटण यांच्याकडून १ हजार २९५ , तहसील कार्यालय कराडकडून १ हजार २३२ यासह प्रांत कार्यालय पाटण, तालुका कृषी अधिकारी कराड, नगर पंचायत पाटण, महावितरण, वन विभाग, दुय्यम निबंधक, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, जिल्हा रुग्णालय कराड यांच्यामार्फत लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राच्या राज्यगीताने झाली. कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्र्यांनी लोकनेते बाळासाहेब देसाई आणि स्व.शिवाजीराव देसाई यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात लाभवस्तू व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सातारा जिल्हा दिव्यांग सर्वेक्षण कार्यक्रमाचा शुभारंभदेखील यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाला अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार सर्वश्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, महेश शिंदे, शहाजी पाटील, अनिल बाबर, प्रकाश आबिटकर आदी उपस्थित होते.

## मुंबईसह भारतात ३० लाख बनावट ..

यातील मोठा खेळाडू ठरला तो मलबार हिल पोलिसांनी अटक केलेल्या आरोपी. त्याचं नाव अब्दुल मन्सूरी असून त्याने त्याच्या फोटोचा वापर करुन तब्बल ६८५ सिम कार्ड जारी केले होते.

चौधरी म्हणाले की, आम्ही या प्रकरणाचा वेगवेगळ्या दृष्टीने तपास करत आहोत. ऊजढ च्या माहितीनुसार, मुंबईत एकूण ३०,००० सिमकार्ड आहेत जी बेकायदेशीरपणे जारी करण्यात आली होती. डीओटीच्या सूत्रांनी सांगितले की देशात अशाप्रकारे एकूण ३० लाख सिम कार्ड जारी करण्यात आले होते, जे डीओटीने थांबवले आहेत. सूत्रांनी सांगितले की, या सिमकार्डचा वापर सायबर गुन्हेगार, बनावट कॉल सेंटर ऑपरेटर आणि क्रिकेट बुकी करतात.

## नाशिक शहरासह जिल्ह्यात..

सज्ज ठेवला आहे. दिवसेंदिवस उन्हाचा तडाखा वाहत असल्याने महापालिका सतर्क झाली आहे.

सकाळी सात वाजेपासून ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत उन्हाचा तडाखा जाणवत आहे. उन्हामुळे नागरिकांच्या तब्येतीत बिघाडहोत असल्याची उदाहरणे आहेत. यामुळे पालिकेने महत्वाचा निर्णय शहरातील चार रुग्णालयात हिट स्ट्रोक रूम सज्ज करण्यात आल्या आहेत. यानुसार नाशिकरोड येथील बिटको, जाकीर हुसेन, पंचवटी व सिडकोतील मोरवाडी येथील पालिकेच्या रुग्णालयात प्रत्येकी पाच उष्माघात कक्षात पाच खाटांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

हवामान विभागाने नुकतीच उष्णतेची लाट येणार असल्याचे भाकीत केले आहे त्यानुसार पालिकेने खबरदारी घेतली आहे. उष्णतेची लाट येण्याच्या पार्श्वभूमीवर पालिकेचा आरोग्य विभाग दक्ष झाला असून, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात उष्माघात कक्ष स्थापन करण्याचे निर्देश काही दिवसापूर्वी देण्यात आले होते.

## महागाई दर घटला, कर्ज..

आला असून तो १८ महिन्यांतील नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. या दरम्यान खाद्यपदार्थांच्या महागाईचा दरही कमी झाला आहे. मार्च २०२३ मध्ये अन्नधान्य महागाई ४.७९ टक्क्यांवरून ४ टक्क्यांच्या खाली ३.८४ टक्क्यांवर आली आहे. एक वर्षापूर्वी, एप्रिल २०२२ मध्ये, किरकोळ महागाई ७.७९ टक्के आणि अन्नधान्य महागाई ८.३१ टक्के या सर्वोच्च पातळीवर होती.




## पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने कर्नाटक राज्यामध्ये काँग्रेस बहुमत मिळाल्या बद्दल जल्लोष

पंढरपूर/प्रतिनिधीः कर्नाटक राज्यामध्ये काँग्रेस पक्षाचे उमेदवार प्रचंड मतांनी निवडून आल्याबद्दल व कर्नाटक मध्ये काँग्रेसचे सरकार बहुमताने आल्याबद्दल पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने पंढरपूर तालुका अध्यक्ष माननीय श्री हनुमंत मोरे व ओबीसी च्या वतीने माजी जिल्हाध्यक्ष मा श्री समीर कोळी व सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष माननीय श्री राजकुमार पवार व सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस माननीय श्री किशोर महाराज जाधव व पंढरपूर तालुका वरिष्ठ उपाध्यक्ष माननीय श्री राहुल जी पाटील व पंढरपूर मंगळवेढा विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष माननीय श्री बलदेव शिकलकर सोशल मीडियाचे पंढरपूर मंगळवेढा अध्यक्ष माननीय श्री बाळासाहेब आजबे व समाजसेवक माननीय श्री शिवाजी धोत्रे माननीय श्री देवानंद इरकल व ब्राह्मण सेलचे जिल्हाध्यक्ष माननीय श्री द बडवे व इतर काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पंढरपुरात शिवव्याख्याते प्रा.नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान

## व्याख्यानातून प्रेरणा घेऊन युवा पिढी नक्कीच यशस्वी घडेल : अभिजीत पाटील



सोलापूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून आणि विठ्ठल प्रतिष्ठान यांच्यामार्फत छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध असलेले शिवव्याख्याते प्रा.नितीन बानगुडे पाटील यांचे छत्रपती संभाजी महाराज यांच्या धगधगत्या इतिहासाचे व्याख्यान आयोजन केले आहे. येत्या १४मे रोजी सायं ७वा. छत्रपती शिवाजी महाराज चौक पंढरपूर (शिवतीर्थ) येथे होणार असून जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनपटलाचा इतिहास समाजापुढे तरुण युवा पिढीसमोर जागर राहावा त्यातून प्रेरणा घेऊन आपल्यामध्ये आत्मसात करावी यातूनच युवा पिढी यशस्वी घडेल असा विश्वास व्यक्त केला आहे.



श्री जानुबाईची यात्रे निमित्त विशेषांकाचे प्रकाशन सा दिव्यगर्जना या अंकाचे प्रकाशन श्री रावसाहेब तात्या पाटील श्री श्री गणेश दादा पाटील भोसे तालुका पंढरपूर विद्यमान सरपंच श्री राजकुमार टरले भाजपा तालुका उपाध्यक्ष श्री हनुमंत मोरे पंढरपूर तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी बाळू गावडे नितीन कोरके मनोज गांधरे बाळू काशीद भगतराव शिंदे दादा कोरके संजय कोरके पाटील दिव्य पत्रकार संजय ननवरे दिव्यगर्जनाचे मुख्य संपादक राजेंद्र कोरके पाटील यांच्या उपस्थितीत अंकाचे प्रकाशन करण्यात आले

# युवकांनी आवडी प्रमाणे शिक्षण, प्रशिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन शिबीराचा लाभ घ्यावा : मंत्री अतुल सावे

औरंगाबाद : राजर्षी छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराच्या माध्यमातून शासन तरुणांना कौशल्याअधारित शिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम राबवित आहे. युवकांनी आपल्या आवडी प्रमाणे शिक्षण, प्रशिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार व पणन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी आज केले.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आज पुंडलिक नगर, तिरुमला मंगल कार्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीराचे उद्घाटन मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते दीप प्रजवलनाने करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी उपसंचालक गणेश दंदे, प्रादेशिक कार्यालयाचे सतिश सुर्यवंशी, औद्योगिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अभिजित आल्टे, कर्नल सतिश ढगे, प्रायार्य डी. एम. पाटील, मार्गदर्शक अनिल जाधव, ड राहूल नांवदर याच्यांसह विद्यार्थी आणि विद्यार्थींनी यांची उपस्थिती होती.

युवकांना प्रशिक्षणातून सक्षम बनवण्यासाठी विविध व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिले आहेत. हे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती, वस्तीगृह सुविधा, शैक्षणीक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहे. या सर्व सुविधांचा लाभ घेवून करिअर करावे. स्पधेच्या युगात बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करुन यशस्वी व्हावे.

त्याप्रमाणे आत्मनिर्भर होण्यासाठी यासर्व सुविधासह मार्गदर्शन शिबीराचाही लाभ घ्यावा. नव मतदारांने आपले नाव मतदार यादीत नोंदविण्याचे आवाहन श्री. सावे यांनी केले




कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावित्यता विभाग अनुसूचित जाती व नवबौद्धाच्या मुलामुलींना शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था यामार्फत आयोजित १० वी १२ वी उत्तीर्ण मुला मुलींसाठी छात्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर मार्गदर्शन शिबीराचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमांत लेप्टनंट कर्नल सतिश ढगे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, स्वत: मधील क्षमता ओळखून करिअर करावे. अभ्यासात सातत्य , मेहनत याबरोबरच शिबीराच्या माध्यमातून मिळणारे मार्गदर्शन घ्यावे. आपल्या क्षमता विकासासाठी योग्य मार्गदर्शन मिळणे खूप महत्त्वाचे असते. ते मार्गदर्शन मिळण्याची संधी या शिबीरातून मिळत असल्याचेही ते म्हणाले.

# गायरान अतिक्रमणधारकांचा भव्य मेळावा




कुरुंदवाड /नामदेव निर्मळे : कुरुंदवाड: येथील जैन सांस्कृतिक भवन येथे शनिवार दि. १३ मे२०२३ रोजी गायरान अतिक्रमणधारकांचा भव्य मेळावा संपन्न झाला.

शासकीय गायरान जमिनीवर निवास करुन राहणाऱ्या गोरगरीब अतिक्रमणधारकांना शासनाच्यावतीने महसूल अधिनियम१९६६ कलम ५० अन्वये शासकीय व गायरान जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत तहसिल कार्यालयाद्वारे तलाठी यांच्यामार्फत नोटिसा दिल्या आहेत.या नोटीसामधील जाचक अटी व शर्तींना कायदेशीररित्या न्यायकक्षेत कसे संरक्षण देता येईल?याबाबत कायदेतज्ज्ञ व लोकप्रतिनिधींनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक निमंत्रक पांडुरंग गायकवाड यांनी केले. मेळाव्याचे उद्घाटन हायकोर्टाचे वकिल अॅड.डॉ. सुरेश माने यांनी केले.यावेळी लोकमोर्चाचे अध्यक्ष – सुभाष गुंडे,माजी जिल्हाधिकारी – बी.जी.वाघ, हायकोर्टाचे माजी न्यायाधीश अनिल वैद्य,माजी खासदार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी,विश्वास बालिघाटे, आम आदमी पार्टीचे आदम मुजावर यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले,– प्रथम धनदांडग्यांचे अतिक्रमण काढा. गोरगरिबांना त्रास दिलात तर रस्त्यावरच्या लढाईत स्वाभिमानी शेतकरी संघटना अतिक्रमणधारकांच्या सोबत असेल.असे अतिक्रमणधारकांना आश्वासित केले.

अॅड.डॉ.सुरेश माने मार्गदर्शन करताना म्हणाले, –संविधानाने स्वाभीमानाने जगण्याचा अधिकार दिला.पण सर्वांना घरे देण्याची जबाबदारी कोणाची? इंग्रजांनी,निजामानी,लोकांना जमिनी दिल्या.शाहू महाराजांनी भटक्या विमुक्तांनाही वसाहती निर्माण करुन घरे दिली.पण आताचे सरकार डोक्यावरील छप्पर काढून घेण्याचे पाप करीत आहे. १९७८, १९९०, २००२, २००७, २०११ चा शासन आदेश निघाला अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे पण कृती शून्य. धनदांडग यांनी लुबाडलेल्या जमिनी काढून घेण्याचे सुप्रीम कोर्टाने सांगितलेल्या आहेत पण जे भूमिहिन,दलित,आदिवासी, आर्थिकदृष्टया कमकुवत असणाऱ्या घटकांनाही त्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे सांगूनही कार्यवाही नाही. धनदांडग्यांना नोटीस नाही पण गोरगरिब लोकांना नोटीसा बजावल्या. यामध्ये भेदभाव करता येणार नाही.

३० दिवसांमध्ये ६ पानांच्या उतरांचा नमुना २५ मुद्यांच्या आधारे सामूहिक तहसिल कार्यालयामध्ये मोर्चाने नोटीसीला उत्तर सादर करा.३प्रतीत सादर करा.त्याची पोहोच घ्या.६ महिन्यांवरील अतिक्रमण काढता येणार नाही. सर्वशक्तिनीशी लोक आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी अतिक्रमणधारक मोठया संख्येने उपस्थित होते.

# मंदिर परिसरात प्रवेश करतांना प्रवेशद्वाराबाहेर पादत्राणे गृहावर ठेवुनच प्रवेश करावा

शिर्डी : सर्व प्रशासकीय अधिकारी/ अधिक्षक विभाग प्रमुख, कर्मचारी यांनी श्रींचे समाधी मंदिर व मंदिर परिसरात प्रवेश करतांना आपले पादत्राणे प्रत्येक प्रवेशद्वाराबाहेर पादत्राणे गृहावर (चप्पल स्टॅन्ड) ठेवुनच प्रवेश करावा अशा सुचना संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १२ मे रोजीचे परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. संरक्षण विभागाने श्री साईभक्त (भाविक) व सर्व ग्रामस्थ यांना श्रींचे समाधी मंदिर व मंदिर परिसरात प्रवेश देतांना पादत्राणे प्रवेशद्वाराबाहेर पादत्राणे गृहावर (चप्पल स्टॅन्ड) ठेवुनच प्रवेश दयावा असे परिपत्रकात नमुद आहे. तसेच दर्शनरांगेत भाविकांना पाय धुण्याची व गंध लावण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तरी सर्व ग्रामस्थ व साईभक्तांनीही मंदिर परिसरामध्ये प्रवेश करतांना आपले पादत्राणे हे




प्रवेशद्वाराबाहेर उपलब्ध करून देणेत आलेल्या पादत्राणे गृहावर (चप्पल स्टॅन्ड) ठेवुनच मंदिर परिसरात प्रवेश करावा असे अवाहन संस्थानचे वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.



# दत्ता भाऊ बागल यांच्या वाढदिवस साजरा

पंढरपूर/प्रतिनिधीः नवे स्थितीज नवी पहाट.. फुलावी आयुष्यातील स्वप्नांची वाट स्मित हास्य तुमच्या चेहऱ्यावर राहो तुमच्या पाठीशी हजारो सूर्य तळपत राहो. मौजे गादेगाव येथील डी बिल्डरचे मालक व डी बिल्डर म्हणून ओळखले जाणारे दत्ताभाऊ बागल यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार समाधान दादा आवताडे जनसंपर्क कार्यालय पंढरपूर या दालनामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे बेस्ट सभापती सोमनाथ मालक आवताडे यांच्या शुभहस्ते मानाचा फेटा प्रेमाची शाल पुष्पहार देऊन सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर प्रसंगी शांतिनाथ बागल एल आय सी , गट नेते श्री.समाधान घायाळ, गणेश बागल, ज्येष्ठ पत्रकार अमिन भाई शेख, राहुल शेठ गावडे, मा. डेप्युटी सरपंच अतीकमुलांनी पांडुरंग वाडेकर, प्रथमेश बागल,सुनील ननवरे आदी मान्यवर उपस्थित होते.


# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

पंढरपूर/प्रतिनिधीः 'इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन' व 'इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स' यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर मधील नेहरूनगर येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालयात 'डिप्लोमा युथ फेस्टिवल' चे आयोजन करण्यात आले होते. या युथ फेस्टिवल मध्ये सोलापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. या उपक्रमांतर्गत झालेल्या विविध स्पर्धांमध्ये स्वेरी संचालित फार्मसी महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केल्यामुळे यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्वेरीने वार्षिक परीक्षांचे निकाल, प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या, प्लेसमेंट मधून निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आदी बाबतीत सातत्याने आघाडी घेतली आहे हे सर्वश्रुत आहे. पण आता या यशस्वीतेत आणखी भर पडली असून क्रीडा विभागातही स्वेरी आपला यशाचा झेंडा फडकवत आहे. 'डिप्लोमा युथ फेस्टिवल' मध्ये विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.



यामधील कॅरम (डबल) या प्रकारात स्वेरी फार्मसी महाविद्यालयाच्या तृतीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या पार्थ दिनेश रावल आणि सुरज बाबुराव पवार यांनी आपली उत्कृष्ठ खेळी साकारत प्रथम क्रमांक मिळविला. या दोन्ही विद्यार्थ्यांना स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा.वैभव गायकवाड यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळविल्यामुळे स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे इतर विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार सर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांकडून विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## शब्दकोडे क्र १३३



आडवे शब्द १. नसता संबंध जोडणे (वाक्य प्रचार) ७. हिंमत, धैर्य १०. मालाची विक्री ११. नवविवाहितेच्या गळ्यातील एक दागिना १२. उपस्थित १४. अभिनय म्हणजे जणू ---- प्रवेश! १७. वर्ष, साल १८. तुझे (कवितेत) १९. रक्षाबंधन २०. मरेपर्यंत २२. लिंबू-पाणी २३. आकाराची उभी रेघ २४. धाक २६. कवडीमोल २८. क्रिकेटमधील धाव ३०. समोरासमोरची चकमक ३२. श्वसनेंद्रिय ३३. रुग्णालय ३५. वर-वधूची मिरवणूक ३७. पैसा आणि बळ यांचा खेळ! ३८. बोजा, वजन ३९. टप्पा, अंतर ४०. विजांचा आवाज ४१. श्रीकृष्णाचे वडील व आई ४३. देव ४४. स्वीकारलेले अवघड काम ४७. देशी 'फ्रीज'! ४८. कागदाचे मोजमाप ५१. तपासनीस (इंग्रजी) ५२. नवीन, न वापरलेली ५५. रामदासस्वामींचा जन्मदिन ५७. एखादे काम करण्यास समर्थ असलेला, क्षमता असलेला ५९. पांढऱ्या टोपीचे गवत ६१. जागृती ६२. शिक्का ६४. श्रीमंत ६७. कैद ६९. लहानच्या विरुद्ध ७०. नासधूस, नासाडी ७३. नरम स्वभावाचा ७४. घराचे धाबे, माळा ७६. चानी ७७. सान ७८. भूकंप ७९. अंत:करण

उभे शब्द १. वस्ती २. हत्तीची ललकारी ३. चकचकीत ४. पाणी साठविण्याचे पात्र (इंग्रजी) ५. आवडता, प्रिय ६. रंग ७. द्रव्य, संपत्ती ८. माझे ९. भरपूर चोप देणे (वाक्य प्रचार) ११. कन्या, मुलगी १३. एक गळीत धान्य १४. दुर्दशा १५. नाद, स्वर, आवाज १६. वेदना १७. याशिवाय उद्धार नाही! १९. वहिवाट, जाणे-येणे २१. दालचिनी २३. पाण्याचा पाट २५. व्रत, नेम २६. मर्कट २७. 'आनंददायी' मिष्टान्न २९. नवरामुलगा ३१. भ्रमर, भुंगा ३२. न आवडणाऱ्या व्यक्तीचे गुणही दोष वाटतात याअर्थी वाक्यप्रचार ३४. जनगणना ३६. लाल व निळा यांच्या मिश्रणातून तयार होणारा रंग ३७. सकसच्या विरुद्ध ३८. किंमत ४२. फळ-पान यांना झाडाशी जोडणारा भाग ४३. सुख देणारी ४५. धनादेश (इंग्रजी) ४६. उत्तराधिकारी ४९. सहाय्यक ५०. आपले राष्ट्रगीत ५२. नाजूक ५३. प्रत्येक दिवशी ५४. फाल्गुनातील पंचमीचे विशेषण ५६. शिक्षा ५८. माफी ५९. थंडी ६०. मजेने रेंगाळत, --- गमत ६३. आंब्याची पोळी ६५. श्रीकृष्णाचे एक नाव ६६. प्रवेश करणे ६८. हद्द (करणे) ७१. जिवलग ७२. मऊ ७५. खून, हत्या

# कौठाळी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी अनिता नागटिळक यांची निवड




पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यातील कौठाळी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी अनिता नागटिळक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कौठाळी ग्रामपंचायतीच्या सरपंच शारदा नागटिळक यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त जागेवर सरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. सरपंच पदासाठी अनिता अरुण नागटिळक यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी सरवळै यांनी निवडणूक बिनविरोध झाल्याचे जाहीर केले.

यावेळी माजी सरपंच मोहन नागटिळक, सोसायटीचे माजी अध्यक्ष ईश्वरा धुमाळ, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका शारदा नागटिळक, माजी सरपंच शंकर गोडसे, उपसरपंच रामदास नागटिळक, उद्योगपती अनिल नागटिळक, माजी सरपंच महादेव गाढवे, सोसायटीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब धुमाळ,माजी सरपंच स्वाती धुमाळ, ग्रामपंचायत सदस्य धोंडीराम वाघमोडे,रूपाली गाढवे, सुरेखा गोडसे, दिलीप इंगळे, अण्णासाहेब नागटिळक, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मोहन पाटील,अनिल नागटिळक, सोसायटीचे चेअरमन यशवंत मोकाशी,रघूनाथ गोडसे, परमेश्वर धुमाळ, अरुण धुमाळ ,वसंत नागटिळक यांच्या सह बहूसंख्या मान्यवर उपस्थित होते

# ‘शासन आपल्या दारी’ उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी शासकीय यंत्रणा व लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करावे : महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

नाशिक : शासन आपल्या दारी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शासकीय यंत्रणा व लोकप्रतिनिधी यांनी समन्वयाने काम करावे, असे प्रतिपादन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हा महसूल विभागाच्या आयोजित आढावा बैठकीत महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील बोलत होते.

यावेळी आमदार डॉ. राहुल आहेर, सीमा हिरे, राहुल ढिकले, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी गंगाथरन डी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, नाशिक अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पाराधे, मालेगाव अपर जिल्हाधिकारी माया पाटोळे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी भिमराज दराडे यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन आपल्या दारी उपक्रम जिल्ह्यात १५ जून २०२३ पर्यंत राबविला जाणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी तहसिलदार व मंडळ अधिकारी यांनी गावपातळीवर जनजागृतीसह विविध आवश्यक दाखले व योजनांचे लाभ नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने




प्रयत्न करावेत. यासोबतच गावपातळीवरील विविध योजनांची प्रलंबित प्रकरणे येत्या १५ दिवसांत तातडीने निकाली काढण्यात यावीत, अशा सूचना महसूल मंत्री श्री. विखे पाटील यांनी संबंधित अधिकारी यांना दिल्या आहेत. बैठकीच्या दरम्यान जिल्हाधिकारी यांनी महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या सद्यस्थितीची माहितीचे सादरीकरण केले. त्याचप्रमाणे मुद्रांक शुल्क विभाग, भूसंपादन व पशुसंवर्धन विभागांनी केलेल्या कार्यवाहीचे सादरीकरण यावेळी केले.

# नेमक्या कोणत्या क्षेत्रात करिअर करावे हे ठरविताना विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक : अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड

यवतमाळ : इयत्ता दहावी ,बारावी हा विद्यार्थ्यांसाठी टर्निंग पॉईंट असतो. इथून पुढे त्यांच्या करियरला सुरुवात होते. आज शिक्षणासाठी अनेक क्षेत्र उपलब्ध आहेत. नेमक्या कोणत्या क्षेत्रात करिअर करावे हे ठरविताना विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना आजच्या करियर मार्गदर्शन शिबिराच्या माध्यमातून ही सुवर्णसंधी मिळाली आहे. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपल्या आयुष्याला आकार द्यावा असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले.औद्योगिक प्रशिक्षण संस्था यवतमाळ येथे आज छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करियर शिबिराचा शुभारंभ राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गजानन राजुरकर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,यवतमाळचे प्राचार्य



विनोद नागोरे, प्राचार्य औ.प्र.सं दारव्हा आर.यु.राठोड, प्राचार्य औ.प्र.सं.आर्णी सुधीर पाटबाने, प्रकल्प अधिकारी,आश्रम शाळा अंतरगाव उषा त्रिपाठी, तसेच प्राचार्य ओ.प्र.सं.लोणार जि.बुलढाणा प्रतिक गुल्हाने यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

पालकमंत्री यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, युवकांना रोजगार देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे.

त्यासाठी विविध रोजगार मेळाव्याचे आयोजन नियमित करण्यात येत असते. पण विद्यार्थ्यांनीसुद्धा केवळ इंजिनियरिंग आणि मेडिकल हेच करिअरचे क्षेत्र न निवडता इतर अनेक क्षेत्रातील चांगल्या करिअरच्या संधी घ्याव्यात. त्याचबरोबर शिक्षण घेतानाच इतर कौशल्येसुद्धा आत्मसात करावीत असे विचार मंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केले.

पालकमंत्र्यांनी यावेळी विविध दालनांना भेटी देऊन प्रदर्शन दालनाचे फीत कापून उद्घाटन केले. याप्रसंगी उपस्थित युवक युवतींशी पालकमंत्री संजय राठोड यांनी संवाद साधला. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी विद्यार्थ्यांना युवा करिअर या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, इयत्ता १० वी, १२ वी.नंतर काय? विद्यार्थ्यांनी कोणते करिअर निवडावे त्यासाठीच हे शिबिरे असतात. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे,आणि विद्यार्थ्यांनी शिबिराचा जास्तीत जास्त फायदा करून घ्यावा व आपला व्यक्तिमत्व विकास साधावा, असे आपल्या भाषणातून सांगितले. या शिबिरात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले होते.

# कृषी विभागामार्फत खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक



अक्कलकोट/प्रतिनिधीः कृषी विभागामार्फत खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले अक्कलकोट येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात नियोजनात्मक चर्चा झाली, तसेच पीक स्पर्धेच्या सहभागी शेतकरी बांधवांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी श्री जयवंत कोरडे (उपविभागीय कृषी अधिकारी), श्री रामचंद्र माळी (तालुका कृषी अधिकारी), श्री सचिन खुडे (गटविकास अधिकारी), श्री विकास पवार (नायब तहसीलदार), श्री महीबूब मुल्ला, श्री आप्पासाहेब पाटील, श्री राजेंद्र बंदीछोडे, श्री वहीदपाशा शेख, सह कृषी अधिकारी कर्मचारी, खत विक्रेते व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

# नवीन वाळू धोरणाच्या यशस्वी अंमबजावणीसाठी नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे : महसूलमंत्री विखे-पाटील



नाशिक : राज्य शासनाने नागरिकांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध होण्यासाठी नवीन वाळू धोरण लागू केले आहे. या नवीन वाळू धोरणाच्या यशस्वी अंमबजावणीसाठी नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले आहे.

चांदोरी तालुका निफाड येथील गोदावरी नदी खोलीकरण व शासकीय वाळू विक्री केंद्राचे उद्घाटन प्रसंगी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील बोलत होते. यावेळी आमदार दिलीप बनकर, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी गंगाथरन डी., नाशिक अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पाराधे, मालेगाव अपर जिल्हाधिकारी माया पाटोळे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता सागर शिंदे, निफाड प्रांताधिकारी हेमांगी पाटील, जिल्हा खनिकर्म अधिकारी रोहिणी चव्हाण, निफाड तहसीलदार शरद घोरपडे यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, नवीन वाळू धोरणामुळे अवैध वाळू उत्खनन व विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी मदत होणार आहे. तसेच यामुळे सामान्य नागरिकांना या धोरणानुसार ६०० रूपये ब्रास प्रमाणे वाळू मिळणार आहे. वाळू खरेदी ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहे. तसेच घरकुलांसाठी लागणारी ५ ब्रास वाळू नवीन धोरणानुसार मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे ही महसूलमंत्री श्री. विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

नदीपात्रातील काढण्यात आलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत वितरीत करण्यात येणार आहे. या नवीन धोरणामुळे बेकायदेशीर वाळू विक्रीला आळा बसणार आहे. त्यामुळे सर्व संबंधित अधिकारी यांनी या नवीन वाळू धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तत्पर राहावे, अशा सूचनाही महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे म्हणाले, राज्य शासनाने लागू केलेल्या नवीन वाळू धोरणाच्या माध्यमातून नागरिकांना वाळू स्वस्त दरात उपलब्ध होण्यासोबतच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबण्यासाठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे पावसाळ्यात गोदावरी नदीला येणाऱ्या पाण्यामुळे चांदोरी, सायखेडा या भागांमध्ये पुरजन्य परिस्थिती निर्माण होते. या ठिकाणी असलेल्या नदी खोलीकरणामुळे नदीपात्रात साठलेला गाळ काढल्याने पुर परिस्थिती नियंत्रणात येणार आहे. या धोरणामुळे शासकीय वाळू केंद्राच्या माध्यमातून घर बांधकाम व्यवसायिक, मोठे प्रकल्पांचे बांधकाम यासाठी देखील वाजवी दरात वाळू उपलब्ध होणार आहे. शासकीय वाळू विक्री केंद्रात वाळू खरेदी धारकांना ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारे पैसे भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे, असे ही विभागीय आयुक्त श्री. गमे यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला शासकीय वाळू विक्री केंद्राचे लोकार्पण महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मधुकर खेलूकर, शाम वायकांडे व जीवन आंबेकर यांना प्रातिनिधीक स्वरूपात ऑनलाइन वाळू वाहतूक पासचे वितरण मंत्री श्री. विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमात आमदार दिलीप बनकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात जिल्हाधिकारी गंगाथरन डी. यांनी नवीन वाळू धोरणाची माहिती दिली. तर आभारप्रदर्शन अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासाकडे वळावे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

पुणे : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध यांच्यावतीने शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात आयोजित छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर मार्गदर्शन शिबिरास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी भेट दिली. करिअर घडविण्यासाठी कौशल्य महत्वाचे असून विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासाकडे वळावे, असे आवाहन पालकमंत्री श्री. पाटील यांनी केले.

यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, कौशल्य विकास रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकता विभागाच्या उपायुक्त अनुपमा पवार, सहआयुक्त एस.बी. मोहिते, औंध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक आर.बी. भावसार, प्राचार्य आय.आर. भिलेगांवकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाचे सहसंचालक यतिन पारगावकर, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी बी.आर. शिंपले आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.पाटील म्हणाले, दहावी, बारावी नंतर विद्यार्थ्यांना करिअरबाबत मार्गदर्शन करण्यासाठी राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्यावतीने ६ जूनपर्यंत या शिबीरांचे आयोजन राज्यातील २८८ मतदार संघात करण्यात आले आहे. ही शिबीरे प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमार्फत घैण्यात येत आहेत.

पदवी शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान प्राप्त होते, व्यक्तिमत्व घडविता येते, परंतु देशाला श्रीमंत बनवायचे असेल तर कौशल्य विकासाशिवाय पर्याय नाही. विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात करण्यासाठी




कमी कालावधीचे व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यातूनही युवकांना स्वत:चा विकास साधता येईल.

महाराष्ट्र शासनाने दरवर्षी ३० लाख एवढी शिष्यवृत्ती जाहीर केली आहे. अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाकडून ८ लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना १५ लाख रुपये कर्ज विनाव्याज दिले जाते. याचा लाभ आत्तापर्यंत ५३ हजार तरुण-तरुणींनी घेतला आहे.

शासनाच्या योजनांचा लाभ घेत कौशल्य प्राप्त करून युवकांनी नोकऱ्या देणारे व्हावे असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी शिबीरात विविध योजनांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराला युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यात कचरामुक्त गाव अभियान

सोलापूर/प्रतिनिधीः आषाढी यात्रा कालावधीत गतवर्षी पालखी मार्गावरील गावात कचरामुक्त गाव ही संकल्पना राबविण्यात आली होती. हीच संकल्पना जिल्ह्यात १५ मे पासून राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती व गावे कचरामुक्त करण्यासाठी कचरामुक्त गाव अभियान सुरू करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे सीईओ दिलीप स्वामी यांनी दिली. शुक्रवारी, जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांची बैठक झाली. या प्रसंगी सीईओ स्वामी यांनी कचरामुक्त गावाची संकल्पना सांगितली.

याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे, प्रभारी शिक्षणाधिकारी जावेद शेख, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, अधीक्षक सचिन सोनकांबळे, शिक्षण समन्वयक शंकर बंडगर, सनियंत्रण सल्लगार यशवंती धत्तरे, घनकचरा सल्लगार मुकुंद आकुडे, संवाद सल्लगार सचिन सोनवणे, सांडपाणी तज्ज्ञ प्रशांत दबडे, क्षमता बांधणी तज्ज्ञ महादेव शिंदे उपस्थित होते. स्वामी म्हणाले, तीर्थक्षेत्राचा जिल्हा म्हणून सोलापूरची ओळख आहे. सोलापूर जिल्ह्यातून भीमा नदी वाहते. ‘नमामि चंद्रभागा’ या नावाने जिल्ह्यात आपण अभियान राबविले आहे.

जिल्ह्यात नदीकाठाबरोबरच इतर गावात स्वच्छतेचे सातत्य टिकवून ठेवणे व गाव कचरामुक्त करणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असेही स्वामी यांनी सांगितले. ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्तरावर जिथे दैनंदिन लोकवर्दळ जास्त आहे, तिथे व सार्वजनिक रस्ते, बाजारस्थळ, बस स्थानके, इतर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेकरिता दैनंदिन झाडलोट व्यवस्था करावी. जास्त लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींनी वॉर्डनिहाय नियोजन करावे.

झाडलोट झाल्यानंतर जमा झालेल्या कचऱ्याचे ओला व सुका असे वेगवेगळे वर्गीकरण करण्यात यावे. असा कचरा कुंडीत संकलित करण्यात यावा. कचरामुक्त गाव करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावेत, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शेळकंदे यांनी सांगितले.